# मार्गदर्शक सुचना - (प्रस्तावित कार्यक्रम - २०१३-१४)

शेतकऱ्यांच्या समुह/गट शेतीस चालना देण्याची योजना सन २०१३-१४

**प्रस्तावनाः-** बदलत्या काळानुसार संसाधनांचा अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने,कीड व रोगाच्या प्रभावी प्रतिबंधासाठी, उत्पादन वाढविण्यासाठी आणि सर्वात महत्वाचे काढणीत्तोर हाताळणी, प्राथमिक प्रक्रिया, विपणनास चालना देण्यासाठी समुह/गट शेतीस चालना देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील शेती आणि शेती आधारीत उदयोगांना चालना देणे आणि त्याव्दारे शेतकऱ्यांना त्याच्या उत्पादनास अधिकाधिक भाव मिळावा या उद्देशाने समुह/गट शेतीस प्रोत्साहान देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

जमिनीच्या विभागाणीमुळे वैयक्तीक शेतकऱ्याला यांत्रीकीकरण,सिंचन इत्यादीवर मर्यादा येतात. उत्पादन खर्च ही वाढतो या ऐवजी सामुहीक शेतीचा दृष्टीकोन ठेवल्यास संसाधनाचा सामुहीक किंवा भाडेतत्वावर वापर, बी-बियाणे, खते, औषधे, निविष्ठा तसेच मालाचे विपणन सामुहीकरित्या करुन मोठे व संघठीत स्वरुपात मागणी करुन स्वस्त दरात निविष्ठा तर वाजवी भावात विपणन करणे शक्य होईल सध्या कार्यरत असलेल्या क्षेत्रीय कर्मचारी व अधिकाऱ्यांची संख्या लक्षात घेता २०,००० शेतकरी समूह गट स्थापन करणे. प्रस्तावीत असून यासाठी प्रत्येक गटास रु.५०००/- प्रती गट याप्रमाणे सन २०१३-१४ साठी २०,००० गट स्थापन करणेसाठी रु.१०.०० कोटी निधी बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.

योजनेचे स्वरुप- महाराष्ट्र राज्यामध्ये बदलत्या काळानुसार संसाधनांचा अधिकाधिक वापर करण्याच्या दृष्टीने,कीड व रोगाच्या प्रभावी प्रतिबंधासाठी, उत्पादन वाढविण्यासाठी आणि सर्वात महत्वाचे काढणीत्तोर हाताळणी, प्राथमिक प्रक्रिया, विपणनास चालना देण्यासाठी समुह/गट शेतीस चालना देणे गरजेचे आहे. वेळेवर सुलभ कर्जपुरवठा, गुणवत्ता पुर्ण निविष्ठांचा वेळेवर पुरवठा, मजूरांची उपलब्धता, पेरणी ते काढणी पर्यत आवश्यक असलेली यंत्रसामुग्री उपलब्धता, पीक संरक्षणाची व्यवस्था,ग्रेडींग पॅकींग, बाजारपेठेची अध्यावात माहिती देणे, यासाठी समुह/गटशेतीस चालना देणे गरजेचे आहे.महाराष्ट्रातील शेती आणि शेती आधारीत उदयोगांना चालना देणे आणि त्याव्दारे शेतकऱ्यांना त्याच्या उत्पादनास अधिकाधिक भाव मिळावा यासाठी बाजारपेठेची अध्यावात माहिती देणे या उद्देशाने समुह/गट शेतीस प्रोत्साहान देणे. यामध्ये शेतकरी समूहाच्या बाबीस अनुसरुन लागणारे प्रशिक्षण,कौशल्यवृध्दी, शेतकरी अभ्यासदौरे,प्रक्षेत्र भेटी, शास्त्रज्ञ मार्गदर्शन,शेतमाल उत्पादन व शेती आधारीत उदयोगांना चालना देणे व त्याचा दर्जा वाढविणे आणि त्याद्वारे शेतकऱ्यांना उत्पादनास अधिकाधिक भाव मिळावा या उद्देशाने समुह/गट शेतीस प्रोत्साहन देणे हे योजनेचे स्वरुप आहे.

www.mahaagri.gov.in

गट स्थापना

- समुह/गट शेतीमध्ये सहभागी होण्यासाठी सभासद स्वतः शेतकरी असणे आवश्यक आहे.

- अशा शेतक-यांनी समुह/गट शेतीचा लाभ घेण्यासाठी गट स्थापन करणे आवश्यक आहे. नोंदणीकृत / नोंदणीविरहीत गटास देखील याचा लाभ घेता येईल. मात्र याबाबत रु. १००/- च्या स्टँपपेपरवर समुह/गट शेतीच्या सभासदांनी करारनामा करणे आवश्यक राहील.'आत्मा अंतर्गत गटाची देखील नोंदणी करता येईल.

- लाभार्थीमध्ये गावाच्या एका भागातील सर्वसाधारणपणे २० शेतक-यांचा गट स्थापन करता येईल. अथवा विशिष्ट पिकाच्या लागवड असलेल्या व्यतिरीक्त जसे शेडनेट खाली पिके घेणारे, फुल उत्पादक, विशिष्ट भाजीपाला किंवा फळ उत्पादक इत्यादि शेतक-यांचा देखील गट बनवता येईल.

- या शेतकरी स्वयंसहाय्यता गटामध्ये सहभागी होण्यासाठी शेतकरी असणे ही एकमेव अट आहे व यासाठी इतर कोणत्याही अटी लागू नाहीत.उदा. आर्थीक उत्पन्न जमीन धारणा इत्यांदी

स्वयंसहाय्यता गटामधील सदस्य हे शक्यतो एकाच आर्थिक स्तरावरचे व एकाच गावातील / एकाच भागातील असावेत.

- कामकाजाचे स्वरुप
- सभासदांनी कामकाज, आर्थिक व्यवहार इत्यादीची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

- सदरील शेतकरी स्वयंसहाय्यता गट स्थापन करताना यात शेतकरी स्वयंसहाय्यता गट होण्याकरीता व दर महिन्यास सर्व सदस्यांनी एकत्र येण्यासाठी कोणतेतरी वस्तुनिष्ठ प्रयोजन असावे किंवा बांधिलकी असावी या हेतूने शेतकरी स्वयंसहाय्यता गटांमध्ये प्रत्येक महिन्याला बचत करणे हे अत्यावश्यक आहे. या बचतीतून स्वयंसहाय्यता गटास भविष्यात बँकेकडून विनातारण पतपुरवठा होण्यासाठी विश्वासार्हता निर्माण होईल असे अपेक्षित आहे.

- समुह/गट शेतीच्या सभासदांनी बचत गट म्हणून कार्यरत राहणे नियमित बैठका घेणे बंधनकारक राहील.

www.mahaagri.gov.in

- स्थापन झालेल्या गटांची स्थापना त्यांच्या नियमीत बैठका,त्यांना एकत्रित ठेवण्यासाठी ठराविक मासिक वर्गणी, कामकाजांची व व्यवहारांची नोंद यासाठी क्षेत्रीय कर्मचाऱ्याकडून प्रशिक्षीत करण्यात येणार आहे. असे स्थापीत गट बॅकेशी जोडण्यात येतील.नाबार्ड सारख्या बॅकेकडे समुह/गट शेतीसाठी अनेक योजनेद्वारे कर्ज पुरवठयासाठी पात्र करुन अल्पदरात व्याजदराने व विना तारण ठेवीच्या तीन/चार पट कर्ज उपलब्ध होऊ शकेल.

स्थापन होणा-या समुह/गट शेतीच्या गटांतर्गत समन्वय साधण्यासाठी तालुका - जिल्हा - राज्य स्तरावर समिती स्थापन करण्यात येतील. या व्यतिरिक्त राज्यातील विविध उत्पादक संघ जसे आंबा काजू - द्राक्ष - मोसंबी - संत्रा - फूल उत्पादक संघ इत्यादि यांचेशी हे समुह/गट शेती गट संलग्न करता येतील.

समुह/गटाचे प्रशिक्षण

- या योजनेचा उद्देश केवळ कृषि उत्पादन वाढविणे इथपर्यंत सिमित नसून गुणवत्तापूर्ण उत्पादित मालाची सक्षमतेने विक्री करणे हा आहे. यासाठी शेतक-यांना विविध प्रकारची प्रशिक्षणे देणे गरजेचे आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील बाबींचा समावेश राहील.
- जागरुकता
- सबळीकरण
- क्षमता बांधणी
- कौशल्य वृध्दी/ उद्योजकता वृध्दी प्रशिक्षणे
- उपक्रमाधिष्ठीत प्रशिक्षणे
- सेवा पुरवठादार
- कुशल स्वरुपाचे कृषि कामे सेवा/भाडे तत्वावर देणे
- काढणी पश्चात तंत्रज्ञान
- मूल्यवृध्दी

www.mahaagri.gov.in

**विपणन**

वरील विषयांवरील प्रशिक्षणे विभागाच्या विविध योजनांतर्गत किंवा राज्य तथा केंद्र शासनाच्या अन्य उपक्रमांमधून देण्यात येतील.

- कृषि विभागाने करावयाची कार्यवाही
- कृषि विभागाअंर्तगत कार्यरत असलेल्या क्षेत्रीय अधिकारी /कर्मचारी यांचे सहकार्याने कृषि अधिकारी २० गट, कृषि पर्यवेक्षक १५ गट व कृषि सहाय्यकांनी १० गट स्थापन करावयाचे आहेत. पहील्या ६ महिन्यांमध्ये गट स्थापन करणे, त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण घेऊन ही कार्यवाही पूर्ण करुन ३० सप्टेंबर, २०१३ पर्यंत नियमित बचत करणाऱ्या गटांचे वर्गीकरण (Gradation) करुन बँकेशी जोडणी करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी. सर्व शेतकरी स्वयंसहाय्यक गटाचे संघटन व नियमित बचतीद्वारे भविष्यात गट कार्यान्वित राहतील, यासाठी सुरुवातीपासून प्रयत्न करावेत.
- या व्यतिरिक्त ग्राम स्तरावरील शासनाच्या विविध योजनांमध्ये स्थापन झालेले अशा पध्दतीचे गट पहिल्या टप्प्यामध्ये शेतकरी स्वयंसहाय्यता गटांमध्ये रुपांतरीत करण्याची कार्यवाही एक महिन्यात करावी.
- स्थापित झालेल्या समुह/गट शेतीची रीतसर धर्मदाय आयुक्त यांचे कडे नोंदणी करणेत यावी.त्याच बरोबर ‘आत्मा’अंतर्गत नोंदणी फी घेऊन नोंदणी करावी.
- कृषि विस्तारविषयक योजना भविष्यामध्ये शेतकरी बचत गटामार्फतच राबवावयाच्या असल्यामुळे विस्तार विषयक योजनांचा लाभ मिळविण्याकरीता शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचा सदस्य असणे ही अट लाभार्थीसाठी अनिवार्य राहील. ही बाब सर्व संबंधित शेतक-यांच्या निदर्शनास आणावी.
- कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांनी शेतकरी स्वयंसहाय्यता गट प्रमुख यांना गटाच्या कामकाज व आर्थिक व्यवहाराबाबतच्या नोंदी ठेवण्याबाबत वेळोवेळी मार्गदर्शन करावे.

तालुका कृषि अधिकारी व उप विभागीय कृषि अधिकारी यांनी कार्यक्रमावर आधारीत निहाय विविध शेतकरी स्वयंसहाय्यता गटांचे फेडरेशन तालुका स्तरावर किंवा उप विभाग स्तरावर करण्याबाबत प्रयत्न करावेत.

www.mahaagri.gov.in

**अर्थसहाय्याचे स्वरुप/नियोजन**

या योजनेअंर्तगत स्थापन झालेल्या समूह गटासाठी १) समूह स्थापना व वार्षिक देखभाल (रजिस्टर्स व इतर साहित्य) यास रु.२०००/- व २) कुशल तंत्रज्ञान प्रशिक्षण/मार्गदर्शन इ.साठी रु.३०००/- असे एकुण रु.५०००/- असा निधी प्रस्तावित आहे.

गट शेती गटास विविध योजनांतर्गत घटकांचा लाभ अटी व शर्तींच्या अधीन राहून प्राधान्याने देण्यात येईल.

सहकार विभागाच्या मदतीने अशा गट शेती गटास लागणारे वित्तीय सहाय्य कमी व्याजदराने उपलब्ध करुन देण्यात येईल.

विविध योजनांतर्गत प्रशिक्षण विषयक बाबी जसे शेतकरी प्रशिक्षण, शेतकरी अभ्यास दौरे, शेतक-यांच्या शेतीशाळा इत्यादिचा लाभ प्राधान्याने गट शेतीसाठी देण्यात येईल.

| अ.क्र. | घटक | प्रति गट | गट संख्या | लागणारे अर्थसहाय्य (रु. लाख मध्ये) |
|---|---|---|---|---|
| १ | समूह स्थापना व वार्षिक देखभाल (रजिस्टर्स व इतर) | २०००/- | १,००० | २०.०० |
| २ | कुशल तंत्रज्ञान प्रशिक्षण/मार्गदर्शन इ.साठी | ३०००/- | | ३०.०० |
| | एकुण | | १,००० | ५०.०० |

सदर योजना राज्यातील सर्व ३३ जिल्हयामध्ये राबविणे प्रस्तावित आहे.

समुह/गट शेती या योजनेसाठी सन २०१३-१४ मध्ये जिल्हानिहाय स्थापित करावयाच्या गटाचे जिल्हानिहाय भौतिक-आर्थिक लक्ष प्रपत्र सोबत जाडले आहे.

-स्वाक्षरीत-

**संचालक आत्मा**

कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र .राज्य. पुण

-----------------------

www.mahaagri.gov.in

जा.क्र./कृआ/गट शेती/मासू/विप्र-५/ ३५३ /२०१३
पुणे-४११ ००५, दिनांक- १६ मे २०१३

प्रति,

१) विभागिय कृषि सहसंचालक,(सर्व)....... यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

-/ यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सदरच्या मार्गदर्शक सूचना पाठवाव्यात व तातडीने अंमलबजावणी सुरु करावी

२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जिल्हा ................(३३ जिल्हे)

-/ यांना सुचित करणेत येते की, सदरची योजना आपल्या जिल्हयात पथःदर्शी तत्वावर राबवावयाची आहे, त्याप्रमाणे आपले स्तरावरुन योग्य ती तातडीची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयुक्तालयास सादर करावा.

-स्वाक्षरीत-

**संचालक आत्मा**

कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र .राज्य. पुणे

www.mahaagri.gov.in

**परिशिष्ट-अ**

“ शेतकरी स्वयं सहाय्यता गट स्थापना ” सभा कामकाज इतिवृत्त

सर्व साधारणपणे खालीलप्रमाणे असावे.

आज दिनांक ................ रोजी .................. शेतकरी स्वयंसहाय्यता गट मु.पो.................. ता..................जिल्हा...................... ची पहिली सभा घेण्यांत आली.

सदर सभेस खालील सभासद उपस्थित होते. सभेत खालीलप्रमाणे ठराव मांडण्यांत आले.

हजर सभासद खालील प्रमाणे -

१...................................... मु.पो....................

२...................................... मु.पो....................

सभेत खालीलप्रमाणे ठराव मांडण्यांत आले.

विषय क्र.१ : शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे नाव ठरवणे.

ठराव क्र.१ : नांव .........................

शेतकरी स्वयंसहाय्यता गट मु.पो..............

सूचक - अनुमोदक –

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.२ : शेतकरी स्वयंसहाय्यक गटाने घ्यावयाचा कार्यक्रम/उपक्रम

ठराव क्र.२ : नांव .......................

शेतकरी स्वयंसहाय्यता गट मु.पो..............

सूचक - अनुमोदक –

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.३ : शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिवांची

: निवड करणे.

www.mahaagri.gov.in

ठराव क्र.३ : शेतकरी स्वयंसहाय्यता गट मु.पो..............

या गटाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांच्या निवडीबाबतचा ठराव मांडण्यांत आला व त्याप्रमाणे खालील प्रमाणे अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि सचिव या पदासाठी सर्वानुमते निवड करण्यांत आली.

अध्यक्ष नांव.............................. मु.पो...................

उपाध्यक्ष नांव.............................. मु.पो..................

सचिव नांव.......................... मु.पो................

सूचक - अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.४ : राष्ट्रीयकृत बँक शाखेत शेतकरी गटाच्या नावे खाते उघडण्याबाबत

ठराव क्र.४ : राष्ट्रीयकृत बँकेचे नांव .......................शाखा.

ता........................ येथे ............... शेतकरी स्वयंसहाय्यता गट.................ता................. नांवे बचत खाते उघडण्याबाबत चर्चा होवून सर्वानुमते ठरवण्यांत आले की, ............................... शेतकरी स्वयंसहाय्यता गटाच्या नांवे........................... राष्ट्रीयकृत बँकेचे नांव ..................... शाखा ................. ता............... येथे सेव्हिंग्ज (बचत) खाते उघडण्यांत यावे.

सूचक - अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र.५ : बचत खाते चालविण्याबाबतचे अधिकार देणे.

ठराव क्र.५ : शाखा ................. येथील बचत खाते चालविण्यासाठी सर्वानुमते खालील तीन सभासदांना सहयांचा अधिकार देण्यांत येत आहे. तसेच सदर खात्यावरील व्यवहार एकावेळी कोणाही दोहोंच्या सहीने करण्यांचे अधिकार देण्यांचे सर्वानुमते ठरले.

नांव १)............................मु.पो.................

२)............................मु.पो.................

३)............................मु.पो.................

सूचक - अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजूर

www.mahaagri.gov.in

**परिशिष्ट-ब**

(शेतकरी स्वयं सहाय्यता गट सभासदांमधील स्थापनेच्या वेळी अंतर्गत करारपत्र)

(रु.२०/- च्या स्टँपपेपरवर मुखत्यारपत्र)

सदर करार ................ रोजी खालील .................. शेतकरी स्वयंसहाय्यता गट ता.................जिल्हा..................... यांच्या खालीलप्रमाणे नांवे असलेल्या सभासदांमध्ये करण्यांत येत आहे.

श्री./ श्रीमती......................वय........मु.पो...............ता..........

श्री./ श्रीमती.....................वय........मु.पो..............ता..........

वरील .................... शेतकरी स्वयंसहाय्यता गट...........मु.पो........ ता........... जि............. चे सभासद आहेत, सामुदायिक त्यांना शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे अध्यक्ष म्हटले आहे, त्यामध्ये करार करण्यांत येत आहे. शेतकरी स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदत्वामध्ये सर्व सभासद त्यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांचा समावेश आहे.................... शेतकरी स्वयंसहाय्यता गट ............ मु.पो............... शेतकरी गटाचे सर्व सभासद ............. गावाचे,............... तालुक्यातील ................ जिल्हयातील असून एकमेकांना चांगले परिचित आहेत. उपरोल्लिखित सभासद स्वेच्छेने, स्वतःच्या आणि कुटुंबियाच्या शेती विषयक उन्नतीसाठी एकत्रित येत आहोत. खालील उल्लेखित अटी आणि शर्तीनुसार आपसातील हितसंबंध सुरक्षित राखून बचत, कर्ज आणि इतर आर्थिक, सामाजिक कर्तव्यपूर्ती साठी शेतकरी स्वयंसहाय्यता गटाची स्थापना करत आहोत.

वरील करारनामा खालील अटी व शर्तीनुसार साक्षांकित करीत आहोत.

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचा प्रत्येक सभासद रु................ (अक्षरी रुपये...................)(काटकसरीतून) प्रत्येक आठवडा / पाक्षिक /मासिक बैठकीमध्ये आणून जमा करेल

प्रत्येक सभासद शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचा यशासाठी प्रयत्न करेल आणि शेतकरी गटाच्या हिता विरोधी कोणतीही कृती अथवा कार्य करणार नाही.

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाने मागणी केलेल्या कर्जाला शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे सर्व सभासद जबाबदार आहेत आणि कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी सर्व सभासदांची आहे.

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाने मिळविलेली सर्व मालमत्ता ही सर्व सभासदांच्या संयुक्त मालकीची आहे आणि राहील. मालमत्तेचा ताबा शेतकरी समूहाने प्राधिकृत केलेल्या सभासदाकडे राहील आणि त्याची जबाबदारी त्या प्राधिकृत सभासदाची राहील आणि आहे.

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदांनी सर्वानुमते श्री. / श्रीमती ........... यांना.................. अध्यक्ष, श्री./श्रीमती .................... यांना उपाध्यक्ष आणि श्री./ श्रीमती ..................... यांना सचिव म्हणून नियुक्त केले आहे. दरवर्षी अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव बदलले जातील व नवीन सभासदांच्या त्या जागी

www.mahagr.gov.in

नियुक्ती केली जाईल. अध्यक्ष, उपाध्यक्ष वा सचिव व्यवस्थित कामकाज करत नसतील तर त्यांच्या जागी सर्वानुमते नवीन नियुक्ती केली जाईल.

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे सर्व सभासद नियुक्त अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांच्या चांगल्या कार्याला समर्थन देतील.

अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव हे शेतकरी स्वयंसहाय्यता गटाच्या दैनंदिन कामकाजामध्ये लक्ष देवून कामकाज करतील. शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे सर्व सभासदांच्या वतीने कर्जासाठी अर्जावर सहया करणे, दैनंदिन कामकाज करणे, बँकिंग व्यवहार करणे या साठी प्रतिनिधींना प्राधिकृत करत आहे.

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचे सभासद खालील प्रतिनिधींना प्राधिकृत करत आहे.

श्री. / श्रीमती ..................................

श्री./ श्रीमती ..................................

श्री. / श्रीमती ................................

वरील प्रतिनिधीपैकी कोणत्याही दोघांची स्वाक्षरी चालेल.

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदाच्या मृत्युनंतर वारसदार (महिला) समूहाची सभासद म्हणून असणा-या सर्व हक्कांची हक्कदार असेल आणि जबाबदार असेल.

सर्व सभासदांच्या सहमतीने करार केला जातो की, सर्व सभासदांच्या सहसमतीशिवाय नवीन सभासद शेतकरी स्वयंसहाय्यता गटाचा सभासद म्हणून घेतला जाणार नाही.

सर्व सभासद दिनांक .................... रोजी सही / अंगठा करत आहेत.

| शेतकरी स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदाचे नांव | सही / अंगठा |
|---|---|
| ......................................... | ................... |
| .......................................... | .................... |

साक्षीदार –

१)

२)

www.mahaagri.gov.in

**परिशिष्ट-क**

शेतकरी स्वयं सहाय्यता गटाने खालील नमुन्यात राष्ट्रीयकृत बँकेमध्ये सेव्हिंग्ज खाते उघडावे

अर्जाचा नमुना

दिनांक :

प्रति,

मा.शाखा व्यवस्थापक,

**……………………**

**……………………**

विषय : **…………………………….** शेतकरी स्वयंसहाय्यता

गटाच्या नांवे खाते उघडण्याबाबत ..

महोदय,

मु.पो………………………. ता…………………… गावच्या आम्ही खालील सही करणार आपणांस सविनय कळवितो की, आमचा ……………. शेतकरी स्वयंसहाय्यता गट मु.पो………………. ता…………………. असून त्यामध्ये ……………. सभासद सआहेत. शेतकरी गटाची स्थापना दि……………. रोजी झालेली आहे.

आमच्या शेतकरी गटाच्या नावे आपल्या शाखेमध्ये बचत खाते उघडण्यांत यावे, ही विनंती.

सोबत - बँकेत खाते उघडण्याचा, सहयांच्या अधिकाराचा आणि सभासदांच्या नावाचा ठराव जोडला आहे.

विनम्र,

| | | |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| सदस्य | उपाध्यक्ष | अध्यक्ष |
| नांव………. | नांव…………… | नांव………… |

शेतकरी स्वयंसहाय्यता गटाच्या सभासदाचे नाव

१)

२)

www.mahaagri.gov.in

**शेतक-यांच्या गट/समूह शेतीस चालना देण्याची योजना सन - २०१३-१४**

**समाविष्ठ जिल्हे - ३३**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका संख्यां | सन २०१३-१४ मध्ये स्थापन करावयाचे नियोजित गट संख्या | सन २०१३-१४ मध्ये वर्ग करावयाचा निधी |
|---|---|---|---|---|
| १ | टाणे | १५ | ४० | २.०० |
| २ | रायगड | १५ | ४० | २.०० |
| ३ | रत्नागिरी | ९ | २५ | १.२५ |
| ४ | सिधुदुर्ग | ८ | २५ | १.२५ |
| **कोकण विभाग** | | **४७** | **१३०** | **६.५०** |
| ५ | नाशिक | १५ | ४० | २.०० |
| ६ | धळे | ४ | १० | ०.५० |
| ७ | नंदरबार | ६ | २० | १.०० |
| ८ | जळगांव | १५ | ४० | २.०० |
| **नाशिक विभाग** | | **४०** | **११०** | **५.५०** |
| ९ | अ.नगर | १४ | ४० | २.०० |
| १० | पणे | १४ | ४० | २.०० |
| ११ | सोलापर | ११ | ३० | १.५० |
| **पुणे विभाग** | | **३९** | **११०** | **५.५०** |
| १२ | सातारा | ११ | ३५ | १.७५ |
| १३ | सांगली | १० | ३० | १.५० |
| १४ | कोल्हापर | १२ | ३५ | १.७५ |
| **कोल्हापूर विभाग** | | **३३** | **१००** | **५.००** |
| १५ | औ.बाद | ९ | २५ | १.२५ |
| १६ | जालना | ८ | २५ | १.२५ |
| १७ | बीड | ११ | ३५ | १.७५ |
| **औरंगाबाद विभाग** | | **२८** | **८५** | **४.२५** |
| १८ | लातर | १० | ३० | १.५० |
| १९ | उस्मानाबाद | ८ | २५ | १.२५ |
| २१ | परभणी | ९ | २५ | १.२५ |
| २२ | हिंगोली | ५ | १० | ०.५० |
| २० | नांदेड | १६ | ४५ | २.२५ |
| **लातूर विभाग** | | **४८** | **१३५** | **६.७५** |
| २३ | बलढाणा | १३ | ४० | २.०० |
| २५ | वाशिम | ६ | २० | १.०० |
| २४ | अकोला | ७ | २० | १.०० |
| २६ | अमरावती | १४ | ४० | २.०० |
| २७ | यवतमाळ | १६ | ४० | २.०० |
| **अमरावती विभाग** | | **५६** | **१६०** | **८.००** |
| २८ | वर्धा | ८ | २० | १.०० |
| २९ | नागपर | १४ | ४० | २.०० |
| ३० | भंडारा | ७ | २० | १.०० |
| ३१ | गोदिंया | ८ | २० | १.०० |
| ३२ | चंद्रपर | १४ | ४० | २.०० |
| ३३ | गडचिरोली | १२ | ३० | १.५० |
| **नागपर विभाग** | | **६३** | **१७०** | **८.५०** |
| **एकण** | | **३५४** | **१०००** | **५०.००** |

www.mahaagri.gov.in